# IB INFOTECH ENTERPRISES LIMITED

Reg. Off.: 428, Kailash Plaza, Vallabh Baug Lane, Ghatkopar (E), Mumbai 400 075.

Telephone No. (022) 6670 9800 Email ID: iielimited@yahoo.in

**CIN: L30006MH1987PLC045529**

31st May, 2022

To,
The Department of Corporate Services,
BSE Limited,
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street,
Mumbai-400 001

Dear Sir,

**Scrip Code: 519463**

**Sub: Submission of Newspapers Cutting**

Pursuant to Regulation 33 read with Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, the Board of Directors have approved the Audited Financial results for the quarter and year ended 31stMarch, 2022 in their meeting held on 30th May, 2022 and published the same in the daily newspapers as per the said Regulations.

We are submitting herewith Newspaper Cuttings of the results Published in "Financial Express" in English and duly translated in Marathi in "Apla Mahanagar" daily newspaper on 31st May, 2022.

Kindly take the same on record and acknowledge the same.

Thanking You,
Yours Faithfully,
For **IB Infotech Enterprises Limited**

Jasmin Rasiklal Parekh
Digitally signed by Jasmin Rasiklal Parekh
Date: 2022.05.31 12:10:55 +05'30'

**Jasmin Parekh**
**Director**
**DIN: 06507112**
**Encl: As below**

## कोरोनात दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना केंद्र सरकारची मदत

**मुंबई ।** कोरोनामुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना पीएम केअर्स फॉर चिल्ड्रन या योजनेंतर्गत मिळणारे सर्व लाभ देण्यासाठी ३० मे रोजी केंद्र सरकारच्या वतीने देशभर ऑनलाईन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात मुंबई उपनगर जिल्हा सहभागी झाला. मुंबई उपनगर जिल्ह्यातील दोन्ही पालक गमावलेल्या एकूण १७ बालकांना प्रत्येकी १० लाख रुपये डिपॉझीट केलेले त्यांच्या नावाचे पासबुक, पीएमजेएवाय हेल्थ कार्ड, पंतप्रधानाचे मुलांना पत्र आणि मुलाचे पीएम केअर प्रमाणपत्र यांचे वाटप करण्यात आले.

# यूपीएससी परीक्षेत राज्यातून प्रियंवदा म्हाडदळकर अव्वल

**खास प्रतिनिधी । मुंबई**

प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री असते असे म्हटले जाते. मात्र केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) परीक्षेमध्ये महाराष्ट्रातून अव्वल आलेल्या प्रियंवदा म्हाडदळकर यांच्या यशाच्या मागे त्यांच्या पतीचा मोठा वाटा आहे. यूपीएससी परीक्षा देण्याच्या निर्णयाला पाठिंबा देण्यापासून परीक्षा केंद्रावर जाणे, तसेच परीक्षेच्या तयारीला वेळ देता यावा यासाठी स्वत: जेवण बनवण्याची जबाबदारी पती विद्याधर श्रीधर यांनी सांभाळल्यामुळे परीक्षेत यश मिळवणे शक्य झाल्याचे प्रियंवदा यांनी सांगितले. त्याचबरोबर या यशामध्ये आई-वडील, शिक्षक, प्रशिक्षक आणि मित्रमंडळी यांचीही मोलाची साथ लाभली आहे.

रत्नागिरीमध्ये जन्म झालेल्या प्रियंवदा यांचे वडील कोकण विकास महामंडळामध्ये कामाला होते. त्यांची मुंबईमध्ये बदली झाली. त्यामुळे जन्म रत्नागिरीचा असला तरी संपूर्ण शिक्षण मुंबईमध्येच झाले. त्यांनी मुंबईतील व्हीजेटीआयमधून इंजिनियरिंगचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी आयआयएम बंगळुरू येथून २०१६ मध्ये एमबीएचे शिक्षण पूर्ण केले. वडील सरकारी नोकरीमध्ये काम करत असल्याने त्यांचा आदर्श डोळ्यासमोर होता. त्यामुळे लहानपासूनच आपण आयएएस अधिकारी व्हावे असे ठरवले होते. तसेच आईचीही आयएएस व्हावे अशी इच्छा होती. परंतु स्वत: आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे यासाठी आपण नोकरी करण्याचा निर्णय घेतला. याच कालावधीमध्ये २०१८ मध्ये विद्याधर श्रीधर यांच्यासोबत माझे लग्न झाले. बँकिंग क्षेत्रामध्ये सहा वर्षे काम केल्यानंतर मी केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा देण्याचा निर्णय घेतला. आपण आपल्या समाजाचे, देशाचे काही देणे लागतो. आपल्या शिक्षणाचा आपल्या देशाला फायदा व्हावा या उद्देशाने मी यूपीएससी परीक्षा देण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय जेव्हा मी माझ्या पतीला सांगितला तेव्हा त्यांनी मला परीक्षेसाठी प्रोत्साहन देत माझ्या निर्णयाचे स्वागत केले. त्यानुसार जुलै २०२० मध्ये नोकरी सोडून परीक्षेच्या तयारीला सुरुवात केली. माझे स्वप्न पूर्ण करण्यासाठी नवऱ्याने मला मदत केली. पती आणि त्यांच्या कुटुंबियाने पाठिंबा दिल्याने मनावरील ताण कमी झाला. प्रिलियम्स, इंटरव्ह्यूचा सराव करण्यासाठी ते मला मदत करत होते. कोविड काळामध्ये माझा वेळ वाया जाऊ नये यासाठी त्यांनी मला स्वत: जेवण बनवून दिले होते. इंटरव्ह्यूला जाण्यासाठी त्यांनी वेळ काढून सुट्टी घेऊन दिल्लीला घेऊन गेले होते. त्यांनी खूप सहकार्य केले आहे. आयएएस होणे ही एक माझ्यासाठी संधी आहे. हे सर्वांना माहीत असल्याने मला घरातील सर्वांनीच सहकार्य केल्याचे प्रियंवदा म्हाडदळकर यांनी सांगितले.



### स्त्री शिक्षणासाठी कार्य करायचे आहे

शिक्षण हा हृदयाजवळचा विषय आहे. मी स्वत: खूप शिकली आहे. शिक्षणामुळे आपल्या परिस्थितीत फरक पडतो आणि आपल्याला किती संधी मिळतात हे मी अनुभवले आहे. मुलींच्या शिक्षणासाठी काहीतरी ठोस करण्याची इच्छा असल्याचे प्रियंवदा यांनी सांगितले.

### तरुणांसाठी संदेश

आपल्या ध्येयासाठी प्रामाणिकपणे तयारी करायची आहे. एक ध्येय निश्चित करायचे आहे. त्यानुसार वेळ ठरवून अभ्यास करायचा आहे.

## अकरावी प्रवेशासाठी भरले २० हजार अर्ज

**मुंबई ।** मुंबई महानगर क्षेत्र, पुणे-पिंपरी चिंचवड, नागपूर, नाशिक, अमरावती या महापालिका क्षेत्रातील इयत्ता अकरावी प्रवेश प्रक्रियेला केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने सोमवारपासून सुरूवात झाली. पहिल्याच दिवशी या पाचही महानगर पालिकेच्या क्षेत्रातील तब्बल २० हजारपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी अकरावी प्रवेश अर्जाचा पहिला भाग भरला आहे. यामध्ये मुंबई महानगर क्षेत्रातून सर्वाधिक १२ हजार विद्यार्थ्यांनी अर्ज भरले आहेत.

इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल जूनच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे शिक्षण संचालनालयाकडून अकरावीची परीक्षा प्रक्रिया राबवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार ३० मेपासून अकरावी प्रवेश प्रक्रियेचे ऑनलाईन अर्ज भाग १ भरण्यास सुरुवात झाली. भाग १ मध्ये विद्यार्थ्यांना नोंदणी करणे, लॉगिन आयडी, पासवर्ड तयार करणे, तसेच अर्ज आपली माध्यमिक शाळा किंवा मार्गदर्शन केंद्र यांच्याकडून प्रमाणित करून विद्यार्थ्यांना घ्यायचा आहे. ऑनलाईन अर्ज भरण्याच्या पहिल्याच दिवशी पाचही महानगरातून २० हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी अर्ज भरले.

# प्रत्येक जिल्ह्यामध्ये कुलगुरू संवाद कार्यक्रम घ्यावा

**खास प्रतिनिधी । मुंबई**

मुंबई विद्यापीठातील परीक्षा विभागाशी संबंधित विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी कुलगुरूंकडून दर मंगळवारी 'कुलगुरू संवाद' कार्यक्रम राबवण्यात येतो. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा वाढता प्रतिसाद पाहता ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्गमधील विद्यार्थ्यांनाही याचा फायदा व्हावा यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये 'कुलगुरू संवाद' कार्यक्रम घेण्यात यावा, अशी मागणी सिनेट सदस्य अ‍ॅड. वैभव थोरात यांनी केली आहे.

मुंबई विद्यापीठाचा विस्तार हा मुंबईपासून सिंधुदुर्गापर्यंत आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात ग्रामीण व दुर्गम भाग आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी कलिना कॅम्पसपर्यंत पोहचू शकत नाही. त्यामुळे या भागातील विद्यार्थ्यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ठाणे, कल्याण, मीरा भाईंदर, पालघर, वसई-विरार, शहापूर, नवी मुंबई, पनवेल, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या ठिकाणच्या विद्यार्थ्यांच्या व तेथील प्राध्यापकांच्या अडचणी जाणून घेऊन त्या सोडवण्यासाठी कुलगुरूंनी पुढाकार घेणे अपेक्षित आहे. त्यामुळे अशा ठिकाणी कुलगुरूंनी आठवड्यातून एकदा संवाद कार्यक्रम घ्यावा. जेणेकरून विद्यार्थी व प्राध्यापकांना आपल्या अडचणी व समस्या मांडण्यासाठी दूरवरचा प्रवास करून मुंबईला येण्याची आवश्यकता भासणार नाही. तसेच त्यांचा त्रासही कमी होण्यास मदत होईल. यामुळे वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले प्रश्न सोडवण्यास मदत होईल. त्याचबरोबर कुलगुरूंना त्यांच्या समस्या प्रत्यक्ष अनुभवता येतील, अशी सूचना सिनेट सदस्य अ‍ॅड. वैभव थोरात यांनी कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर यांना पत्राद्वारे केली आहे. कलिना कॅम्पसमधील कुलगुरू संवाद कार्यक्रमाबद्दल त्यांनी कुलगुरूंचे आभारही मानले.




### फॉर्च्युनर गाडीचा वापर करा

कुलगुरू सुहास पेडणेकर यांनी विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या शुल्कातून घेतलेल्या फॉर्च्युनर गाडीवरून चौफेर टीका झाली होती. परंतु कुलगुरुंनी या गाडीचा वापर करून विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या विविध जिल्ह्यांतील विद्यार्थी आणि महाविद्यालयांना भेटी द्याव्यात. त्यामुळे गाडी घेण्याचा उद्देश सफल होईल, असेही वैभव थोरात यांनी कुलगुरुंना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे.

# २६९ अनधिकृत शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊ नये

**प्रतिनिधी । मुंबई**

मुंबई शहर व उपनगरात तब्बल २६९ अनधिकृत शाळा असून त्यामध्ये कोणत्याही पालकांनी आपल्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश घेऊ नये, असे आवाहन पालिका प्रशासनाने केले आहे. महापालिकेने सदर अनधिकृत शाळांची यादी पालिकेच्या संकेतस्थळावर माहितीसाठी दिली आहे. वास्तविक, अनधिकृत शाळांवर बंदी घालणे व आर्थिक दंड आणि कायदेशीर कारवाई करण्याची कायद्यात तरतूद आहे. मात्र कारवाई शासन स्तरावर करणे अपेक्षित आहे. त्यामुळे महापालिका फक्त अनधिकृत शाळांबाबतची माहिती जनतेला उपलब्ध करते आणि मुंबई विभागाच्या शिक्षण संचालकांनाही अहवाल रूपाने माहिती कळवते. मात्र कारवाईबाबत पालिकेचे हात बांधलेले आहेत.

मुंबई महापालिका शहर व उपनगरे हद्दीतील प्राथमिक शाळांना शासनाची / स्थानिक प्राधिकरणाची मान्यता घेणे, ही बाब 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९' मधील 'कलम १८ (१)' नुसार बंधनकारक आहे. या कायद्यानुसार शासन / स्थानिक प्राधिकरणाची मान्यता न घेणाऱ्या अनधिकृत शाळांना नोटीस (सूचनापत्र) देण्यात येते. सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठीदेखील या शाळांना शासनाची परवानगी आणणे अथवा शाळा बंद करण्याबाबतची नोटीस देण्यात आलेली आहे. सदर सूचनापत्रानुसार 'कलम १८ (१) व (५)' नुसार द्रव्य दंडाच्या शिक्षेसह कायदेशीर कारवाईची सूचनादेखील संबंधितांना देण्यात आलेली आहे, अशी माहिती शिक्षण खात्याद्वारे देण्यात आली आहे. तसेच, सदर अनधिकृत शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊ नये, असे आवाहन करणारी जाहिरात वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

मुंबईत दरवर्षी अनधिकृत शाळांची नोंद केली जाते. पालिकांना अशा अनधिकृत शाळांमध्ये आपल्या मुलांसाठी प्रवेश न घेण्याचे आवाहन करण्यात येते. गेल्या अनेक वर्षांपासून अनधिकृत शाळांचे प्रकरण असेच सुरू आहे. मात्र अशा शाळांमध्ये गरजेपोटी किंवा नाईलाजास्तव अथवा शाळा अनधिकृत असल्याचे माहिती नसल्याने काही पालक आपल्या विद्यार्थ्यांना त्याच शाळेत शिक्षण घेण्यासाठी पाठवतात. पुढे त्या विद्यार्थ्यांचे भविष्य मात्र अंधारात असते.

सदर अनधिकृत शाळांकडून कागदपत्रांची व इतर कायदेशीर प्रक्रिया करून आणि त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करून त्या अनधिकृत शाळांना मान्यता द्यावी, अशी मागणी शिक्षण समितीच्या बैठकीत काही सदस्यांनी यापूर्वी केली होती. मात्र त्यानंतर त्याबाबत काहीच तोडगा निघालेला नाही. मुंबई महापालिकेच्या संकेतस्थळावर गेल्यावर्षी २८३ अनधिकृत शाळांची यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. यापैकी ४ शाळांना राज्य शासनाद्वारे 'स्वयंअर्थसहाय्यित' तत्त्वावर परवानगी देण्यात आलेली आहे. तर, ४ शाळांना 'राष्ट्रीय मुक्त विद्यालयी शिक्षा संस्थान' यांची मान्यता प्राप्त झालेली आहे. या व्यतिरिक्त गेल्यावर्षीच्या यादीतील ११ शाळा बंद झालेल्या आहेत. यानुसार यंदाच्या शैक्षणिक वर्षाच्या सुधारित यादीमध्ये १९ शाळांना वगळण्यात आले आहे. तसेच यंदाच्या शैक्षणिक वर्षाच्या यादीमध्ये नव्याने आढळून आलेल्या ५ शाळांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे एकूण २६९ अनधिकृत शाळांची यादी सन २०२२-२०२३ करीता तयार करण्यात आलेली आहे.



### मुंबई महापालिकेचे पालकांना आवाहन

**आयबी इन्फोटेक एन्टरप्रायझेस लिमिटेड,**
सीआयएन: एल३०००६एमएच१९८७पीएलसी०४५५२९
नोदणी. कार्या.: ४२८, कैलाश प्लाझा, वल्लभ बाग लेन, घाटकोपर (पूर्व), मुंबई – ४०००७५.
दूर. क्र.: (०२२) ६६७० ९८०० ई–मेल: iielimited@yahoo.com

**३१मार्च २०२२ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि वर्षासाठी एकमेव लेखापरीक्षित आर्थिक निष्कर्ष**

**रु. लाखांमध्ये (प्रती समभाग माहिती वगळता)**

| अनु. क्र | तपशील | संपलेले त्रैमासिक | | | संपलेले वर्ष | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ३१.०३.२०२२ | ३१.१२.२०२१ | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२१ |
| १ | कार्यामधून एकूण उत्पन्न | (०.५२) | ०.४७ | (०.१०) | (२.२२) | (२.४४) |
| २ | कालावधीसाठीनिव्वळ नफा / (तोटा) (कर, अपवादात्मक आणि / किंवाअतिविशिष्ट बाबी पूर्व) | (१.९०) | (०.४०) | (५.६८) | (११.९१) | (८.६८) |
| ३ | कर पूर्व कालावधीसाठीनिव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि / किंवाअतिविशिष्ट बाबी पश्चात) | (१.९०) | (०.४०) | (५.६८) | (११.९१) | (८.६८) |
| ४ | करपश्चातकालावधीसाठीनिव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि / किंवाअतिविशिष्ट बाबी पश्चात) | (१.९०) | (०.४०) | (५.६८) | (११.९१) | (८.६८) |
| ५ | कालावधीसाठी एकूण सर्वंकष उत्पन्न(कालावधीसाठीएकत्रित नफा / (तोटा) (कर पश्चात) आणि अन्य सर्वंकष उत्पन्न (करपश्चात) | (१.९०) | (०.४०) | (५.६८) | (११.९१) | (८.६८) |
| ६ | भरणा केलेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य रु. १०/– प्रत्येकीचे) | १२८.०७ | १२८.०७ | १२८.०७ | १२८.०७ | १२८.०७ |
| | राखीव(३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या गत वर्षाच्याताळेबंदामध्ये दाखविण्यात आल्यानुसार पुनर्मुल्यांकितराखीव वगळता राखीव) | – | – | – | (८७.२९) | (७५.३८) |
| | प्रती समभाग उत्पन्न (ईपीएस) ए) मूळ आणि सौम्यीकृत ईपीएस (अपवादात्मक बाबी पूर्व) (रु. १०/– प्रत्येकीचे) | (०.१५) | (०.०३) | (०.४४) | (०.९३) | (०.६८) |
| बी | मूळ आणि सौम्यीकृत ईपीएस (अपवादात्मक बाबी पश्चात) (रु. १०/– प्रत्येकीचे) | (०.१५) | (०.०३) | (०.४४) | (०.९३) | ( ०.६८) |

टिपा:
१. भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (लिस्टिंग अँड ऑब्लिगेशन डिसक्लोझर रिक्वायरमेंटस), नियमावली, २०१५ च्या नियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजमध्ये सादर करावयाच्या उपरोक्त त्रैमासिक आणि वर्षासाठी लेखापरीक्षित वित्तिय निष्कर्षांच्या तपशिलवार नमुन्याचा आराखडा आहे. त्रैमासिक आर्थिक निष्कर्षाचा पूर्ण आराखडा स्टॉक एक्स्चेंजच्या संकेतस्थळ www.bseindia.com वर आणि कंपनीचे संकेतस्थळ www.ibinfotech.net.in वर देखील उपलब्ध आहे.
२. उपरोक्त लेखापरीक्षित निष्कर्षाचे लेखा परीक्षण समितीद्वारे समीक्षण करण्यात आले आहे आणि संचालक मंडळाने त्यांच्या ३० मे २०२२ रोजी झालेल्या सभेमध्ये नोंद पटावर घेतले आणि संमत केले.
३. गत वर्ष/ कालावधीसाठीचे आकडे मार्च ३१, २०२२ रोजी संपलेल्या वर्षासाठी वर्गीकरण निश्चित करण्यासाठी आवश्यक तेथे पुनर्वर्गीकृत आणि पुनर्गठीत करण्यात आले आहेत.

**ठिकाण: मुंबई**
**दिनांक: ३० मे २०२२**

**संचालक मंडळाद्वारे**
**आयबी इन्फोटेक एन्टरप्राईझ करिता**
**रिता सिंघ**
**संचालक**
**०१९८८७०९**

## शिक्षकांसाठी १ जूनपासून वेतन श्रेणी प्रशिक्षण होणार

**मुंबई ।** राज्यातील शिक्षक, मुख्याध्यापक, अध्यापकाचार्य, प्राचार्य यांच्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत १ जूनपासून वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड श्रेणी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. ऑनलाईन स्वरुपात होणाऱ्या या प्रशिक्षणासाठी ९४ हजार ५४१ शिक्षकांनी नोंदणी केली आहे. राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील नोंदणीकृत प्रशिक्षणार्थींचे एकाच वेळी प्रशिक्षण होणार आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत घेण्यात येणारे हे प्रशिक्षण ५० ते ६० तासांचे असून प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी ३० दिवसांचा कालावधी देण्यात येणार आहे. त्यामुळे प्रशिक्षणासाठी पात्र शिक्षक आपले प्रशिक्षण ऑनलाईन स्वरूपामध्ये ३० दिवसांच्या कालावधीमध्ये त्यांच्या उपलब्ध वेळेनुसार पूर्ण करू शकणार आहेत.

**सुलभ इंजिनियर्स अ‍ॅण्ड सर्व्हिसेस लिमिटेड**
सीआयएन:एल२८९२०एमएच१९८३पीएलसी०२९८७९
आर/ओ: कार्यालय क्र. २०६, २ रा मजला, अपोलो कॉम्प्लेक्स प्रिमायसेस कॉऑपरेटिव्ह सोसायटी लि., आर.के.सिंग मार्ग, पारसी पंचायत रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०००६९
कॉर्पोरेट कार्यालय: १७/११, द मॉल, कानपूर – २०८००१
ई–मेल: sulabheng२२@gmail.com, sulabhinvestorcell@gmail.com
दूर: नोंदणी. कार्या: ०५१२–२३११२२६, २३१९७०५ फॅक्स क्र–०५१२–२३६३७७४ संकेतस्थळ: www.sulabh.org.in

**३१मार्च, २०२२ रोजी संपलेले त्रैमासिकआणि वर्षासाठी एकमेव आणि एकत्रिकृत लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षाच्या निवेदणाचा आराखडा.**

**(रु. लाखांमध्ये)**

| तपशील | एकमेव | | | | एकत्रिकृत | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रोजी संपलेले त्रैमासिक | | रोजी संपलेले वर्ष | | रोजी संपलेले वर्ष | |
| | ३१/०३/२०२२ | ३१/०३/२०२१ | ३१/०३/२०२२ | ३१/०३/२०२१ | ३१/०३/२०२२ | ३१/०३/२०२१ |
| | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित |
| कार्यातून एकूण उत्पन्न | ३१.४६ | ३७.०१ | १५८.१६ | ११९.७७ | ३७४.२९ | २४८.१४ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (कर, अपवादात्मक आणि/ किंवाअतिविशिष्ट बाबीपूर्व) | २.१२ | २३.५० | ७९.२१ | ८७.०० | १२३.३१ | १४३.८१ |
| कर पूर्वकालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि किंवा अपवादात्मकबाबींपूर्व) | २.१२ | २३.५० | ७९.२१ | ८७.०० | १२३.३१ | १४३.८१ |
| करपश्चात कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मकआणि/ किंवाअतिविशिष्टबाबींपश्चात) | ४.६२ | ५.९० | ६७.७१ | ५२.९० | १११.०२ | १०६.७१ |
| कालावधीसाठीएकूण व्यापक उत्पन्न (कालावधीसाठीएकत्रित नफा/ (तोटा) (कर पश्चात) आणि अन्य व्यापक उत्पन्न (कर पश्चात) | ४.६२ | ५.९० | ६७.७१ | ५२.९० | १११.०२ | १०६.७१ |
| सम भाग भांडवल | १००४.७५ | १००४.७५ | १००४.७५ | १००४.७५ | १००४.७५ | १००४.७५ |
| राखीव(पुनर्मुल्यांकित राखीव वगळता राखीव) | – | – | १५२०.२१ | १४५२.५० | २०३८.९४ | १९४९.१५ |
| प्रती भाग उत्पन्न (अतिविशिष्ट बाबीं पश्चात) (रु.१/– प्रत्येकीचे) मूळ: | ०.०१ | ०.०१ | ०.०७ | ०.०५ | ०.११ | ०.११ |
| सौम्यीकृत: | ०.०१ | ०.०१ | ०.०७ | ०.०५ | ०.११ | ०.११ |

टीपा:
१. सेबी (लिस्टिंग ऑब्लिईगेशनअ‍ॅण्डडिसक्लोझर रिक्वायरमेंट रेग्युलेशन)नियमावली, २०१५ च्या ३३ च्या अनुषंगाने स्टॉक एक्सचेंजमध्ये सादर करावयाच्या त्रैमासिक वित्तीय निष्कर्षाचा उपरोक्त हा सविस्तर आराखडा आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षा चा पूर्ण आराखडा स्टॉक एक्सचेंजच्या www.bseindia.com ह्या संकेतस्थळावर आणि कंपनीच्या www.sulabh.org.in वर देखील उपलब्ध आहे.

**ठिकाण: कानपूर**
**दिनांक: ३०.०५.२०२२**

**सही/–**
**(विमल कुमार शर्मा)**
**संचालक**
**डीआयएन: ००९५४०८३**

**पश्चिम रेल्वे**

ई–निविदा मागणी सूचना क्र. : **C45/1/SBD/2021/4/GMU, Dated : 26.05.2022**

वभागीय रेल्वे व्यवस्थापक (वाणिज्यिक), मुंबई विभाग, पश्मि रल्वे, मुंबई सेंट्रल पाच वर्षांसाठी 'ए' आणि 'बी' वर्गाच्या खालील स्थानकांमधील सामान्य गौण युनिट्समध्ये खान–पान सेवा पुरविण्यासाठी व्यक्ती / सोल प्रोपरायटरी फर्म / कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत नोंदणीकृत कंपन्या / भागीदारी कायदा, १९३२ अंतर्गत नोंदणीकृत भागीदारी संस्थांकडून ई–निविदा मागवीत आहेत..

| अ. क्र. | निविदा सूचना क्र. | श्रेणी आणि सब कोटा | स्थानक | स्थानकांची श्रेणी | युनिटचा प्रकार | स्थळ | प्रति वर्ष राखीव किंमत (रु. मध्ये) | इसारा रक्कम (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | C45/BIM/2018/ TS/2-3/1 | सामान्य | बिलीमोरा जं. | बी | टी स्टॉल | फलाट क्र. २/३ (चैनेज २२५ मीटर्स येथे) | १,८०,०००/– | १८,८००/– |
| २ | C45/UVD/2018/ TS/2-3/1 | सामान्य | उधवाडा | बी ॥ | टी स्टॉल | फलाट क्र. २/३ (ओएचई मास्ट १८१/३६ जवळ) | २१,२८७/– | २,३००/– |
| ३ | C45/UVD/2018/ TS/1/2 | सामान्य | उधवाडा | बी ॥ | टी स्टॉल | फलाट क्र. १ (ओएचई मास्ट ६ जवळ) | २१,२८७/– | २,३००/– |
| ४ | C45/BIM/2018/ TS/1/2 | सामान्य | बिलीमोरा | बी | टी स्टॉल | फलाट क्र. १ (चैनेज ११५ मीटर्स येथे) | १,८४,०००/– | १९,२००/– |
| ५ | C45/UVD/2018/ TS/1/1 | सामान्य | उधवाडा | बी ॥ | टी स्टॉल | फलाट क्र. १ (ओएचई मास्ट १८२/२ जवळ) | २१,२८७/– | २,३००/– |
| ६ | C45/BIM/2018/ TS/2-3/2 | सामान्य | बिलीमोरा जं. | बी | टी स्टॉल | फलाट क्र. २/३ (चैनेज ३२० मीटर्स येथे) | १,८०,०००/– | १८,८००/– |
| ७ | C45/BL/2018/ TS/1/3 | सामान्य | वलसाड | ए | टी स्टॉल | फलाट क्र. १ (ओएचई मास्ट क्र. १९८/६बी व १९८/८बी दरम्यान) | २,८०,५००/– | २९,२००/– |
| ८ | C45/BL/2019/ TS/1/4 | सामान्य | वलसाड | ए | टी स्टॉल | फलाट क्र. १ (पिलर नं. ६ व ७ दरम्यान) | ४,९२,०००/– | ५१,२००/– |
| ९ | C45/BL/2019/ TS/1/5 | सामान्य | वलसाड | ए | टी स्टॉल | फलाट क्र. १ (पोल नं. १० व ११ दरम्यान) | ४,९२,०००/– | ५१,२००/– |
| १० | C45/BL/2019/ TT/1/5 | सामान्य | वलसाड | ए | ट्रॉली नं.५ | फलाट क्र. १ | २,९७,६६०/– | ३१,०००/– |
| ११ | C45/BL/2018/ TS/1/1 | सामान्य | वलसाड | ए | टी स्टॉल | फलाट क्र. १ (पोल नं. १२ व १३ दरम्यान) | २,९१,५००/– | ३०,४००/– |
| १२ | BL/2019/TT/1/21 | सामान्य | वलसाड | ए | ट्रॉली | फलाट क्र. १ | २,९७,६६०/– | ३१,०००/– |
| १३ | NVS/TS/1/1 | | नवसारी | ए | टी स्टॉल | फलाट क्र. १ (किमी २३७/२ जवळ, मध्य पे अ‍ॅण्ड यूज आणि पीवे कार्यालय दरम्यन, फलाट क्र. २/३ च्या पोल क्र. ११ समोर | २,२४,०००/– | २३.३००/– |
| १४ | NVS/TS/2-3/2 | सामान्य | नवसारी | ए | टी स्टॉल | फलाट क्र. २/३ किमी २३६/२७ जवळ, दक्षिण एफओबीच्या दक्षिण बाजूला | २,१२,०००/– | २२.१००/– |
| १५ | C45/NVS/2019/ TS/1/3 | सामान्य | नवसारी | ए | टी स्टॉल | फलाट क्र. १, पोल क्र. १४–१५, मायक्रोवेव्ह स्टेशन कार्यालय आणि पाण्याची टाकी दरम्यान, पोल क्र. १४ उत्तर बाजू, किमी २३६/३२–२३६/३४ | २,७०,०००/– | २८.१००/– |
| १६ | C45/BU2018/ JS/4-5/4 | सामान्य | वलसाड | ए | ज्यूस स्टॉल | फलाट क्र. ४/५ (पोल क्र. ३२ व ३३ दरम्यान) | २,३१,०००/– | २४.१००/– |
| १७ | C45/1/VAPI/2020/ TS/ Circulating/2 | सामान्य | वापी | ए | टी स्टॉल | स्टेशनच्या पूर्व बाजूला, एन्ट्री पॉईंट आणि मध्य एफओबीच्या उतरणीजवळ | २,८८,७५०/– | ३०.१००/– |
| १८ | C45/BIM/2018/ TS/2-3/3 | सामान्य | बिलीमोरा जं. | बी | टी स्टॉल | फलाट क्र. २/३ (चैनेज ३७० मीटर्स येथे) | १,८०,०००/– | १८,८००/– |
| १९ | C45/NVS/2018/ TS/2-3/1 | सामान्य | नवसारी | ए | टी स्टॉल | फलाट क्र. २/३, पोल क्र. १७ व १८ दरम्यान, पोल क्र. १७ च्या दक्षिणेला | २,२०,०००/– | २२,९००/– |
| २० | C45/1/NVS/2020/ TS/ Circulating/1 | जीएमयू–महिला | नवसारी | ए | टी स्टॉल | पश्चिम परिघिय क्षेत्रामध्ये | २,८५,०००/– | २९,७००/– |
| २१ | C45/1/AN/2020/ TS/ Circulating/1 | जीएमयू–महिला | अमळनेर | बी | टी स्टॉल | स्टेशन बिल्डींगच्या मेन एन्टरन्स येथे दक्षिण पश्चिम परिघिय क्षेत्र | १,३५,०००/– | १४,१००/– |
| २२ | C45/BIM/2018/ TS/1/1 | सामान्य | बिलीमोरा जं. | बी | टी स्टॉल | फलाट क्र. १ (चैनेज ५५ मीटर्स येथे) | १,८४,०००/– | १९,२००/– |
| २३ | C45/BIM/2018/ TS/1/3 | सामान्य | बिलीमोरा जं. | बी | टी स्टॉल | फलाट क्र. १ (चैनेज १४५ मीटर्स येथे) | १,९२,०००/– | २०,०००/– |
| २४ | C45/1NAPI/2020/ TS/ Circulating/1 | सामान्य – महिला | वापी | ए | टी स्टॉल | परिघिय क्षेत्राच्या उत्तर पश्चिम कोपऱ्यामध्ये | २,८८,७५०/– | ३०,१००/– |

सुधारणा / शुध्दिपत्र, असल्यास : कृपया कोत्याही सुधारणा / शुध्दिपत्रासाठी, निविदा बंद होण्याच्या तारीख व वेळेपर्यंत संकेतस्थळ **www.ireps.gov.in/** वर भेट द्या. निविदा सादरीकरण बंदहोण्याची तारीख व वेळ : २७.०६.२०२२ रोजी १५:00 वाजेपर्यंत आणि निविदा उघडण्याची तारीख व वेळ : २७.०६.२०२२ रोजी १५.३० वाजता फक्त ऑनलाईन संकेतस्थळ **www.ireps.gov.in/** द्वारे. ई - निविदा उघडण्याच्या तारखेपासून प्रस्तावाची वैधता : ६० दिवस. पत्रव्यवहाराचा पत्ता : विभागीय रेल्वे व्यवस्थापक (वाणिज्यिक), विभागीय रेल्वे व्यवस्थापकांचे कार्यालय, तळ मजला, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८ दू. : ०२२ - ६७६ - ४४२४६ / ४४२३८ फॅक्स : ०२२ - ६७६ - ४४२९९ ई - मेल : **cmictgbct@gmail.com** 131

आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly आम्हाला फॉलो करा: twitter.com/WesternRly